# <u>प्रारुप</u>

**मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा. लि., प्लॉट क्र. एफ - १,२,३,८,९,१०, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II व लगतचे गट क्र. ४६ आणि ६३, गाव दरेगाव, व प्लॉट क्र. डी - ५३/१, डी - ५२/६ आणि डी - ५२/७, टप्पा-II, जालना, जि. जालना, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या सध्याचे उत्पादन १००० टीपीडी स्पाँज आयर्न, १००० टीपीडी बिलेट्स, १००० टीपीडी टीएमटी बारस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह ते १००० टीपीडी टीपीडी स्पाँज आयर्न, ३००० टीपीडी बिलेट्स, ३००० टीपीडी टीएमटी रॉडस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी दि. १०/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा. लि., प्लॉट क्र. एफ - १,२,३,८,९,१०, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II व लगतचे गट क्र. ४६ आणि ६३, गाव दरेगाव, व प्लॉट क्र. डी - ५३/१, डी - ५२/६ आणि डी - ५२/७, टप्पा-II, जालना, जि. जालना, महाराष्ट्र येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत.**

मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा. लि., प्लॉट क्र. एफ - १,२,३,८,९,१०, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II व लगतचे गट क्र. ४६ आणि ६३, गाव दरेगाव, व प्लॉट क्र. डी - ५३/१, डी - ५२/६ आणि डी - ५२/७, टप्पा-II, जालना, जि. जालना, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या सद्याचे उत्पादन १००० टीपीडी स्पाँज आयर्न, १००० टीपीडी बिलेट्स, १००० टीपीडी टीएमटी बारस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह ते १००० टीपीडी टीपीडी स्पाँज आयर्न, ३००० टीपीडी बिलेट्स, ३००० टीपीडी टीएमटी रॉडस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी दि. १०/०२/२०२० रोजी सकाळी ११.०० वा. मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा. लि., प्लॉट क्र. एफ - १,२,३,८,९,१०, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II व लगतचे गट क्र. ४६ आणि ६३, गाव दरेगाव, व प्लॉट क्र. डी - ५३/१, डी - ५२/६ आणि डी - ५२/७, टप्पा-II, जालना, जि. जालना, महाराष्ट्र येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

जाहीर लोक सुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री. रविंद्र परळीकर,<br>प्र. अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, जालना,<br>जालना. | अध्यक्ष. |
| २) श्री. दिलीप खेडकर,<br>प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद. | सदस्य. |
| ३) डॉ. योगिनी बाळंखे,<br>उप-प्रादेशिक अधिकारी,<br>म.प्र.नि.मंडळ, जालना. | समन्वयक. |

जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले सदस्य आणि सार्वजनिक सहभागी यांची यादी येथे जोडलेली आहे. डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना तथा सदर समितीचे समन्वयक यांनी उपस्थितांचे आभार मानुन सदर समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. आणि सांगितले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार अधिनियम क्र. एस.ओ. १५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिनियम क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ नुसार मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा. लि., प्लॉट क्र. एफ - १,२,३,८,९,१०, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II व लगतचे गट क्र. ४६ आणि ६३, गाव दरेगाव, व प्लॉट क्र. डी - ५३/१, डी - ५२/६ आणि डी - ५२/७, टप्पा-II, जालना, जि. जालना, महाराष्ट्र यांनी प्रस्तावित केलेल्या सध्याचे उत्पादन १००० टीपीडी स्पाँज आयर्न, १००० टीपीडी बिलेट्स, १००० टीपीडी टीएमटी बारस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह ते १००० टीपीडी टीपीडी स्पाँज आयर्न, ३००० टीपीडी बिलेट्स, ३००० टीपीडी टीएमटी रॉडस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह या प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पासाठी सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. नंतर त्यांनी पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय भारत सरकार अधिनियम क्र. एस.ओ.१५३३. दि. १४/०९/२००६ व सुधारित अधिनियम क्र. एस.ओ. ३०६७ (इ) दि. ०१/१२/२००९ यातील तरतुदी आणि प्रस्तावित प्रकल्पाचा सारांश स्पष्ट करुन पर्यावरण विषयक सल्लागार मे. पोलूशन अँड इकॉलॉजी कंट्रोल सर्व्हिसेसे, नागपुर यांच्या मार्फत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासहीत सादर कलेला अर्ज प्राप्त झाल्यापासुन ते म.प्र.नि.मंडळातर्फे दि.०८/०१/२०२० रोजी **दैनिक सकाळ** - मराठी वृतपत्र व दि. ०९/०१/२०२० दैनिक टाईम्स ऑफ इंडिया इंग्रजी वृत्तपत्रामध्ये नोटीस प्रसिध्द होईपर्यंत पर्यावरण विषयक मंजूरी घेण्यासाठी अवलंबण्यात आलेल्या पध्दतीचे वर्णन केले. त्यांनी सांगितले की सध्याचे उत्पादन १००० टीपीडी स्पाँज आयर्न, १००० टीपीडी बिलेट्स, १००० टीपीडी टीएमटी बारस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह ते १००० टीपीडी टीपीडी स्पाँज आयर्न, ३००० टीपीडी बिलेट्स, ३००० टीपीडी टीएमटी रॉडस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प सदर अधिसूचनेनुसार 'अ'वर्गात मोडतो, ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी लागते, म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सुनावणी घेणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे सांगितले की सदर अधिसूचनेनुसार सदर प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषेतील कार्यकारी सारांश यांच्या मराठी व इंग्रजी भाषेतील प्रती संबंधीत शासकीय कार्यालये जसे, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना, जिल्हा परिषद जालना, जिल्हा उद्योग केंद्र जालना, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जालना, तहसील कार्यालय, जालना, ग्रामपंचायत कार्यालय, दरेगाव, मं.प्र.नि. मंडळाचे कार्यालय, जालना, औरंगाबाद व मुंबई आणि एमओइएफसी कार्यालय, नागपूर, ई. ठिकाणी लोकांच्या अभ्यासासाठी ठेवण्यात आल्या होत्या आणि सदर प्रकल्पाबाबत कुणाला काही सुचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसात नोंदवावे असे लोकांना आवाहन करण्यात आले होते. त्या अनुषंगाने आजपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ,जालना येथे कोणतीही टिप्पणी, सुचना,आक्षेप, इ. प्राप्त झालेली नाही. त्यांनी सांगितले की, जर कुणाला काही सुचना, आक्षेप, इ. नोदवायच्या असतील तर ते आज येथे मौखिक अथवा लिखीत स्वरुपात नोंदवू शकतात. फक्त पर्यावरणाशी संबंधीत प्रश्न विचारावेत अशी त्यांनी विनंती केली. त्याचे प्रकल्प प्रवर्तकातर्फे समाधानकारकरित्या स्पष्टीकरण केल्या जाईल व त्यांची इतिवृत्तामध्ये नोंद घेतल्या जाईल आणि ते जाहीर लोक सुनावणीच्या चित्रफीतीसहीत पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली येथे पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

सादर करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी सदर जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तकास प्रस्तावित प्रकल्पाबाबतचे सादरीकरण करण्या विषयी विनंती केली.

यानंतर प्रकल्पाचे सल्लागार श्री. मोहन रहांगदळे, मे. पोलुशन अँड इकॉलॉजी सर्व्हिसेस, नागपुर यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पावर पॉइंट सादरीकरण केले, ज्यामध्ये प्रकल्पाचा तपशील, पर्यावरणीय प्रदूषण, योजना उपकरणे, करण्यात येणाऱ्या उपाय योजनांचा समावेश केला आहे आणि मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा.लि. यांचा विद्यमान प्रकल्प हा १००० टीपीडी स्पाँज आयर्न, १००० टीपीडी बिलेट्स, १००० टीपीडी टीएमटी बारस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांटसह असा आहे आणि प्रस्तावित विस्तारीकरण हे १००० टीपीडी टीपीडी स्पाँज आयर्न, ३००० टीपीडी बिलेट्स, ३००० टीपीडी टीएमटी रॉडस् ५० एमडब्लु कॅप्टीव्ह पावर प्लांट असे असेल. सदर प्रकल्पाचे स्थळ हे प्लॉट क्र. एफ - १,२,३,८,९,१०, अतिरिक्त म.औ.वि.म., टप्पा-II व लगतचे गट क्र. ४६ आणि ६३, गाव दरेगाव, व प्लॉट क्र. डी - ५३/१, डी - ५२/६ आणि डी - ५२/७, टप्पा-II, जालना, जि. जालना, महाराष्ट्र येथे स्थित आहे. त्यांनी सांगितले की, देशातील नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य वापर व्हावा याकरीता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय सतत कार्यरत असते. एमओइएफ व सीसी अधिसुचना २००६ नुसार प्रत्येक उद्योगाला त्यांचे उत्पादन वाढवणे, आधुनिकीकरण / नुतनीकरण पर्यावरण विषयक मंजुरी लागते. प्रस्तावित प्रकल्पास तज्ज्ञ मुल्यांकन समिती (इएफ-इंडस्ट्रीज) च्या दि. २६/०६/२०१९ रोजी झालेल्या २६ व्या बैठकीत दि. ०५/०९/२०१९ रोजी प्राथमिक मंजुरी देण्यात आलेली आहे. तज्ज्ञ मुल्यांकन समिती (इएफ-इंडस्ट्रीज) च्या मानकांनुसार प्रस्तावित प्रकल्पा सभोवतालची पर्यावरण विषयी माहिती पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे आणि सदर प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारा दूष्परिणाम व त्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाय योजना या बाबतच्या माहितीचे देखील सदर अहवालामध्ये तपशीलवार वर्णन केलेले आहे.

त्यांनी सांगितले की, सदर प्रकल्पाचे उत्पादन हे स्पाँज आयर्न, बिलेटस्, टीएमटी रॉडस् आणि विज हे असेल व त्यासाठी लागणारा कच्चा माल आयर्न ओर, पेलेटस् आयर्न स्क्रॅप, पीग आयर्न, सिलिको मॅगनीज व डोलामाईट आहे. प्रकल्पास लागणाऱ्या पाण्याची आवश्यकता ८३२ घ.मी.प्र.दि. असेल व त्याचा स्त्रोत म.औ.वि.म. असेल, विजेची आवश्यकता ५८ एमडब्लु असेल व त्याचा स्त्रोत एमएसईडीसीएल असेल. एकुण प्रकल्प क्षेत्र ६.८६ हेक्टर एवढे आहे. सध्या ४०० कामगार कार्यरत आहे व प्रस्तावित पकल्पामध्ये आणखी २१० कामगारांची आवश्यकता असेल, म्हणजेच सदर प्रकल्पासाठी लागणारे एकुण मनुष्यबळ ६१० असेल. प्रकल्पाची एकुण किंमत रु. १०३.७५ कोटी आहे.

त्यांनी प्रकल्प स्थळाचा नकाशा, प्रकल्प क्षेत्राच्या १० कि.मी.त्रिजेच्या क्षेत्राचा टोपोशिट नकाशा, गुगल नकाशा आणि सदर प्रकल्पाचा ले-आऊट प्लान दाखविला. त्यांनी पुढे प्रकल्प क्षेत्राची पर्यावरण विषयक माहिती दाखविणार तक्ता दाखविला आणि सांगितलते की, प्रकल्पाचे नाव मे. ओम साईराम स्टील अँड अॅलॉईज प्रा.लि. आहे, समुद्र सपाटीपासुनची उंची ५२९ मी. आहे, जवळचे शहर-जालना ०.६ कि.मी. अंतरावर (द.पू.), जवळचे रेल्वे स्थानक-जालना, प्रकल्प क्षेत्राच्या १० कि.मी. त्रिजेच्या परिसरात कोणतेही संवेदनशील स्थळे जसे वन्यजीव अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान, राखीव जंगल नाहीत, जवळचा महामार्ग नागपूर-औरंगाबाद-मुंबई, जवळची नदी-कुंडलीका नदी-४.० कि.मी. अंतरावर (पु) मोती तलाव - २.० कि.मी. अंतरावर (द.पू.) आणि मुक्तेश्वर तलाव - ३.० कि.मी. अंतरावर (द.पू.) ला आहे.

त्यांनी विद्यमान व प्रस्तावित उत्पादन क्षेमतेविषयी सांगितले की, विद्यमान प्रवर्तन भट्टीची क्षमता १×२५T व १×३०T, २×५०० TPD भट्टी स्पॉज आयर्न करिता आणि १०००TPD रोलींग मिल करीता आहे. विस्तारीकरण आणि आधुनिकीकरणानंतर प्रवर्तन भट्टीची क्षमता २×४०T व ३×६०T असेल, स्पाँज

आयर्नचे उत्पादन जसेच्या तसे राहील, कॅप्टीव्ह पावर प्लांट हा ५० एमडब्लूचा असेल आणि रोलिंग मिलची क्षमता १००० TPD पासुन ते ३००० TPD अशी असेल. सदर प्रकल्पासाठी लागणारा कच्चा माल असा असेल जेस डी आर आय - ३३००० TPA, पिग आयर्न - १०५००० TPA, स्कॅप - ६६५००० TPA व सिलीका मॅगनीज - १०००० TPA व आऊटलेट जसे हॉट मेटल - १०२९६०० TPA, स्लॅग-८०४०० TPA असे असेल. रोलींग मिलसाठी लाबणार कच्चा माल हा हॉट मेटल- १०२९६०० TPAअसेल व आऊटपूट हे टीएमटी-९९०००० TPA आणि टेलींग्ज-३९४०० TPA असे असेल, त्यांनी सदर प्रकल्पाचा प्रकिया तक्ता दाखविला आणि सांगितले की, स्क्रॅप, स्पाँज आयर्न, पिग आयर्न आणि डीआरआय हे प्रवर्तन भट्टीमध्ये तापविले जाईल नंतर कॅस्टर विनेटमधून द्रव धातू तयार होईल व बिलेटपासून रोलींग मिल मध्ये टीएमटी बारस् तयार होईल, पुनप्रक्रियेत वेगवेगळे स्कील वापरण्यात येतील आणि धूर हा स्क्रबर मधून चिमणीद्वारे पसरविल्या जाईल.

त्यांनी जल, वायु व ध्वनीचे अभ्यास क्षेत्र आणि ज्या ठिकाणाहुन नमुने संकलीत केले ते दर्शविणारा नकाशा दाखविला. त्यांनी अभ्यास क्षेत्रातील वायु व जल परिक्षणाचा बाबत सांगितले की, त्यांनी परिसरातील वायुचे विवधि ठिकाणचे नमुने संकलीत केले जसे, प्रकल्प स्थळ, चंदनझीरा गांव, जालना शहराची दक्षिण बाजु, दावलवाडी गाव, जवसगा, रहेमानगंज, भिलपूरली (खु.) आणि गुंडेवाडी भु-पृष्ट जलाचे नमुने मोती तलाव, मुक्तेश्वर तलाव, दावलवाडी तलाव, घाणेगाव तलाव, कुंडलीका नदी उर्ध्वा व उर्ध्वा प्रवाह आणि भूजलाचे नमुने हलडोज, जलसगाव, राजवाडी, जालना आणि चंदनझीरा येथून संकलीत केले.

**हवा पर्यावरण:**- त्यांनी सांगितले की, त्यांनी डिसेंबर.२०१८ ते फेब्रुवारी, २०१९ या काळात ८ ठिकाणी हवेची गुणवत्ता तपासली. ज्यामध्ये हवेची दिशा, संवेदशील ठिकाणे व मानवी वसाहत यांचा समावेश होतो. अभ्यास क्षेत्रात हवेची गुणवत्ता पुढिल प्रमाणे आढळून आली (PM१०) ४२.४ ते ६२.२ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर, (PM२.५) १८.१ ते २७.९ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर, (So2) १०.० ते १८.६ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर, (NOx) ११.० ते २८.४ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर (CO) ०.१ ते ०.४ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर आणि (O) - ६.७ ते ७.६ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर.

**ध्वनी पर्यावरण:**- त्यांनी सांगितले की, प्रकल्प क्षेत्राच्या बफर झोन मध्ये ध्वनी पातळी ३६.४ ते ७२.६ dB(A), नोंदविण्यात आली. जास्तीत जास्त कामे ही दिवसाच्या वेळी केली जात असल्यामुळे उच्चतम ध्वनी पातळी दिवसाच्या वेळी नोंदविण्यात आली.

**जल पर्यावरण:**- त्यांनी सांगितले की, प्रकल्प क्षेत्रातील भुजलाचे नमुने व भुपृष्ट जलाचे ५ नमुने असे एकुण १२ नमुने गोळा करुन त्याचे विश्लेषण करण्यात आले. पाणी व सांडपाण्याच्या नमुन्याची विश्लेषण पध्दती ही अमेरिका पब्लिक हेल्थ असोसिएशन (APHA) च्या प्रमाणित पध्दतीनुसार करण्यात आली.

त्यांनी पुढे सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पामुळे परिसरातील वायुमध्ये अंदाजे जी वाढ होईल ती अशी प्रकल्प स्थळा जवळ – ०.००४ मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर व चंदनझीरा गाव – ०.२०० मायक्रो ग्रॅम प्रति घन.मीटर त्यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे Sox आणि Nox मध्ये जंदाजे जी वाढ होईल त्या बाबतचा तपशील दाखविला.

**श्री. रंगदहाळे** यांनी वायु प्रदूषण नियंत्रण उपयांविषयी सांगितले की, वायु प्रदूषण नियंत्रणासाठी उत्पादनासाठी लागणारा कच्चा माल शेडमध्ये साठविण्यात येईल, कच्चा माल लोडींग-अनलोडींग करताना धुळ नियंत्रण प्रणाली बसविण्यात येईल, कच्चा मालाची वाहतुक करणाऱ्या वाहनांची तपासणी नियमीतपणे करण्यात येईल, परिसरातील वायु व चिमणीतुन निघणाऱ्या वायुची सीपीसीबीच्या (CPCB) मार्गदर्शक तत्वानुसार तपासणी करण्यात येईल व ते नियंत्रित करण्यात येईल.

धूर नियंत्रित करण्यासाठी सायक्लॉन, बॅग फिल्टर व इएसपी बसविण्यात येईल, आम्लवर्गीय वायु स्क्रबरद्वारे नियंत्रित करण्यात येईल, प्रवर्तन भट्टी मधुन निघणारे वायु प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी भट्टीला मुव्हेबल सक्शन हुड बसविण्यात येइल आणि प्रकल्प परिसरात झाडे लावुन वायु प्रदूषण नियंत्रित केल्या जाईल.

त्यांनी ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्रणाली बददल सांगितले की, ध्वनी प्रदूषणाचे मुख्य स्त्रोत डी.जी. सेट, कॉम्प्रेसर, क्रशर, स्क्रीन, इ. आहेत. ध्वनी कमी करण्यासाठी उपकरणांना ध्वनी रोधक कव्हर बसविण्यात येईल, प्रकल्प क्षेत्राच्या सिमेलगत दाट हरित पट्टा विकसित करण्यात येईल आणि भौतिक अडथळ्यांचा वापर करुन ध्वनी थांबविण्यात येईल, परिसरातील ध्वनी पातळी ही दिवसा ७५ dB(A) पेक्षा कमी असेल व रात्री ७० dB(A) पेक्षा कमी असेल आणि जवळचे रहिवाशी क्षेत्र १.५ कि.मी. अंतरावर असल्यामुळे ध्वनी प्रसारणामुळे कोणताही विपरित परिणाम होणार नाही.

प्रस्तावित जल प्रदूषण नियंत्रण प्रणाली बाबत सांगितले की, विद्यमान तसेच प्रस्तावित प्रकल्पासाठी पाण्याची आवश्यकता ८३२ केएलडी (ताजेपाणी) आहे आणि प्रक्रियेमधुन पूनर्चकित केलेले पाणी ९९१० केएलडी आहे. विद्यमान तसेच प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पात क्लोइड सर्किट कुलींग प्रणाली परिकल्पित आहे. एकुण ८३२ केएलडी पाण्यापैकी १०५ केएलडी सांडपाण्याची निर्मिती होईल ज्यामध्ये २५ केएलडी घरगुती सांडपाणी आणि ८० केएलडी हे कुलिंग टावर ब्लोडावुन चा समावेश होतो. घरगुती सांडपाण्यावर सेप्टीक टँक मध्ये प्रक्रिया केली जाईल या व्यतिरिक्त सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (STP) बसविण्यात येईल आणि प्रक्रिया केलेले पाणी हरित पट्टा विकसित करण्यासाठी वापरले जाईल. कुलिंग टॉवर ब्लोडावुन मधुन निघणाऱ्या पाण्यावर सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा (ETP) मध्ये प्रक्रिया केली जाईल आणि प्रक्रिया केलेले पाणी पुनर्चक्रित केल्या जाईल व डीआरआय कॅप्टीव्ह पावर प्लांट व रोलिंग मिल मध्ये वापरले जाईल व त्यायोगे झिरो लिक्वीड डिस्चार्ज प्रणाली साध्य केली जाईल. त्यांनी पाण्याचा प्रक्रिया प्रवाह दाखविला आणि सांडपाणी निर्मिती व व्यवस्थापन या विषयी सांगितले. त्यांनी सांगितले की, प्रकल्पातुन एकुण २.५ घ.मी.प्र.दि. सांडपाण्याची निर्मिती होईल, घरगुती सांडपाण्यावर २५ घ.मी.प्र.दि. क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणेमध्ये प्रक्रिया केली जाईल, म्हणजेच तृतीत प्रक्रिया ज्यामध्ये मल्टी ग्रेड फिल्टर व चारकोल फिल्टरचा समावेश होतो. पावसाच्या व्यतिरिक्त बाकीच्या ऋतुमध्ये बागेच्या उद्देशासाठी प्रक्रिया केलेले सांडपाणी वापरुन झिरो लिक्विड डिस्चार्ज साधले जाईल.

त्यांनी घनकचरा नियंत्रणा विषयी सांगितले की, सदर प्रकल्पातुन निघणारा एसटीपी स्लज १ कि.ग्रॅ. प्र.दि. असेल व तो हरित पट्टा विकसित करण्यासाठी वापरण्यात येईल तसेच प्रकल्पातून निर्माण होणारा कार्यालयीन कचरा व पॅकिंग प्रत्येकी ५० कि.ग्रॅ.प्र.दि. असेल, व स्लॅग २३६ टन प्र.दि. असेल आणि त्याची विल्हेवाट विक्रि/वापर करुन केली जाईल. प्रवर्तन भट्टीमध्ये वापरलेले ऑईल व प्रक्रियमधून निघणारी धातु मळी विकल्या जाते, प्रवर्तन भट्टीमधुन निर्माण होणारी धातु मळी ही वाळु सारखी असल्यामुळे ती जमिनीतील खड्डे भरण्यासाठी वापरण्या जाऊ शकते. कॅन्टीन आणि कार्यालयीन प्रसाधन गृहातुन निघणारे सांडपाणी सोक पिटला पाठविले जाईल कॅन्टीन मधुन निघणाऱ्या सांडपाण्यावर इटीपीमध्ये प्रक्रिया केली जाईल ज्यामध्ये ऑईल अॅण्ड ग्रीस ट्रॅप, सेटलिंग टॅंक, अॅन अॅरोबीक प्रक्रिया प्रणाली आणि ग्रॅव्हीटी फिल्टरचा समावेश केलेला आहे.

त्यांनी पुढे आपत्ती व्यवस्थापन योजने विषयी सांगितले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सहाय्याने आपत्ती व्यवस्थापन योजना तयार आणि विकसीत केली जाईल, आपत्कालीन नियंत्रण कक्ष सुसज्ज साधनांनी बांधले जाईल आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात येईल. आधिकारी आणि कर्मचारी यांची

संघामध्ये विभागणी केली जाईल व त्यांनी आपत्कालीन परिस्थितीमध्ये अग्निशमन आणि सुरक्षा करिता प्रशिक्षण दिले जाईल, सुरक्षित आरोग्य व पर्यावरण योजना तयार केली जाईल आणि कामगार कल्याणाकरिता त्यांची अंमलबजावणी करण्यात येईल.

त्यांनी EHS अंदाजपत्रकाविषयी सांगितले की, त्यामध्ये सामग्री हाताळणी यार्ड, हॉट मेटल टॅपींग क्षेत्र, डीएम प्लांट क्षेत्र, रोलींग मिल क्षेत्र DRI प्लांट आणि सामान्य सुरक्षा यांचा समावेश होतो, यासाठी कारखान्याने प्रतिवर्ष रु. ५.४० लाखांची तात्पुरती तरतुद केलेली आहे. त्यांनी पुढे पर्यावरण नियंत्रणासाठी लागणाऱ्या निधी मध्ये पुढिलप्रमाणे भांडवली रक्कम गुंतवली जाईल. उत्सर्जन नियंत्रण अभियांत्रिकी रु. ११४०.०० लाख, जल आणि घनकचरा व्यवस्थापन रु. ६५.०० लाख, घनकचरा रु. २२.५० लाख, हरित पट्टा रु. १६.५० लाख, रेन वाटर हार्वेस्टिंग रु. २२.०० लाख, आणि सुरक्षा व व्यवसाईक आरोग्य रु. २५.०० लाख अशा प्रकारे पर्यावरण नियंत्रणासाठी एकुण भांडवली किंमत रु. १३२५.०० लाख असेल आणि त्यासाठी आवर्ती खर्च हा प्रति वर्ष रु. ५०९.४० लाख असेल.

त्यांनी वृक्षारोपणाविषयी सांगितले की, प्रकल्प परिसरात विविध प्रजाती जसे बाभुळ, नीम, गलमोहर, आंबा, इ. ३६२२ झाडे लावण्याचे प्रस्तावित केले आहे. प्रकल्प प्रवर्तकांनी एकुण संपादीत क्षेत्राच्या ३३ % क्षेत्रावर हरित पट्टा विकसित करण्याचे ठरविले आहे आणि झाडांची लागवड ही वन विभागाच्या सल्यानुसार केली जाईल. त्यांनी सांगितले की, रेन वाटर हार्वेस्टिंग प्रकल्प उभारला जाईल आणि साधारणत: ६५९२.६ घ.मी. पाणी संकलीत केले जाईल.

प्रस्तावित प्रकल्पाचे फायदे स्पष्ट करतांना त्यांनी सांगितले की, प्रकल्प सुरु होण्यामुळे रोजगार आणि व्यापाराच्या संधी उपलब्ध होतील आणि सदर प्रकल्पासाठी कामागारांची एकुण आवश्यकता ही ६१० असेल जवळपासच्या गावात राहणाऱ्या लोकांना प्रकल्पातील विविध कार्ये व रोजगाराच्या बाबतीत प्रत्यक्ष फायदा मिळेल. मे. ओम साईराम स्टील्स ॲण्ड ॲलॉईज प्रा.लि. यांना ते जेथे कार्यरत असेल त्या भागाची संपूर्ण सामाजिक आणि आर्थिक विकासाची जाण आहे.

त्यांनी वार्षिक CSR अंदाजपत्रकाविषयी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकांनी CSR कार्यक्रमा अंतर्गत आरोग्य, शिक्षण, रस्ते, पिण्याचे पाणी, सांस्कृतिक/जनजागृती कार्यक्रम, क्रिडा/युवा विकास, वृक्षारोपण, ग्रामिण विकास/मुलभूत सुविधा, इ. साठी रु. ४५.५० लाख (२०१६-१७), रु. ६१.६ लाख (२०१७-१८) आणि रु. ६१.० लाख (२०१८-१९) असे खर्च केलेले आहे. त्यांनी पुढे CER अंदाजपत्रकाविषयी सांगितले की, प्रकल्प प्रवर्तकांनी CER अंतर्गत विविध कार्यासाठी रु. १०२.८८ लाखांची तरतुद कलेली आहे, जसे गावातील रस्त्यांचे बांधकाम, सामुदायिक शौचालय बांधकाम, रेन वाटर हार्वेस्टिंग रचना, शाळांमध्ये शौचालय बांधणे, शाळांमध्ये खेळाच्या मैदानाची सुविधा, कौशल्य विकास कार्यकम, पशुवैद्यकिय सुविधा, वैद्यकिय केंद्र सुविधा व रुग्णवाहीका आणि वृक्षारोपण कार्यक्रम, इ.

**श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की, पर्यावरण व्यवस्थापन योजना ही या प्रकल्पाचा गाभा आहे त्यासाठी पर्यावरण विषयक मंजुरी घेण्याची प्राथमिक सुरुवात करण्यात आलेली आहे. पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी शासकीय अशासकीय तज्ज्ञ आणि स्थानिक लोकांचे अनुभव व मार्गदर्शनाचा वापर करण्याचा कंपनीचा मानस आहे, त्याकरिता आवश्यक निधी, मनुष्यबळ आणि यंत्रसामुग्री उपलब्ध करण्यात येईल, सर्व प्रकारच्या परवानग्या मिळाल्यानंतर प्रकल्प सुरु करण्यात येईल, ते पर्यावरणाची संपुर्ण काळजी घेतील. पर्यावरण विषयक बहुमूल्य सल्ला देवून प्रस्तावित प्रकल्पास सहकार्य करावे अशी मे. ओम साईराम स्टील्स ॲण्ड ॲलॉईज प्रा.लि. ही कंपनी सार्वजनिक सहभागींना विनंती करित आहे आणि नंतर त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे सादरीकरण समाप्त केले.

**डॉ. योगिनी बाळंखे**, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, जालना तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे समन्वयक यांनी सार्वजनिक सहभागींना विनंती केली की जर कुणाला काही प्रश्न, सुचना, इ. असतील तर ते त्यांनी स्वत:चे नाव व गावाचे नाव सांगुन विचारावेत, असेही सुचित केले.

जाहीर लोक सुनावणी दरम्यान सार्वजनिक सहभागी तसेच समिती सदस्यांनी सदर प्रकल्पाविषयी काही प्रश्न उपस्थित केले आणि प्रकल्प प्रवर्तक प्रकल्प सल्लागार/समिती सदस्य यांनी त्यांची उत्तरे दिली, ती खालील प्रमाणे आहेत.

१) **श्री. गणेश तुकाराम ढवळे**, मा. सरपंच, दरेगाव, ता. व जि. जालना यांनी सदर प्रकल्प दरेगाव परिसरात स्थित असल्यामुळे सामाजिक कार्या अंतर्गत दरेगावासाठी २५% खर्च करावा असे त्यांनी सुचविले. दुसरे त्यांनी सांगितले की कंपनी ३६०० झाडे लावणार आहे, म्हणुन दरेगावात ट्री गार्ड सहित १००० झाडे लावण्याविषयी त्यांनी सुचविले, त्यावर प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार यांनी स्पष्ट केले की ३६०० झाडे ही कारखाना परिसरात लावण्यात येणार आहे, तथापि, अशा प्रकारचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर सामाजिक वृक्षारोपण कार्यक्रम अंतर्गत पावसाळ्यामध्ये दरेगावात ट्री गार्ड १०००-१५०० झाडे लावल्या जाऊ शकतील. **श्री. ढवळे** यांनी निदर्शनास आणुन दिले की ४ वर्षापुर्वी कंपनीने दरेगावात ५०० झाडे ही ट्री गार्ड सहीत लावली होती त्या बद्दल त्यांनी कंपनीचे अभिनंदन केले व तशा प्रकारच्या या वर्षी कंपनीने ट्री गार्ड सहीत झाडे लावण्या विषयी सुचविले आणि ते प्रकल्प प्रवर्तक/प्रकल्प सल्लागार यांनी मान्य केले.

२) **श्री. किसनराव तिरुके**, सरपंच ग्रामपंचायत दरेगाव, ता. व जि. जालना यांनी कंपनी त्यांच्या गावाच्या परिसरात स्थित असल्यामुळे त्यांच्या गावातील जास्तीत जास्त लोकांना रोजगार दिल्या जाईल काय असे विचारले, आधि सांगितल्या प्रमाणे प्रकल्प सल्लागार **श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पामध्ये स्थानिक लोकांना त्यांच्या पात्रतेनुसार प्राधान्य देण्यात येइल आणि त्यांनंतरच बाहेरच्या लोकांना रोजगार दिला जाईल.

३) **श्री. रविंद्र विठ्ठलराव ढवळे**, जालना जिल्ह्यातील जवळच्या भागातील रहीवाशी यांनी सांगितले की त्यांची शेतजमिन म.औ.वि.म. वसाहती जवळ गट क्र. ९३ व ९४ मध्ये स्थित आहे, आणि सायंकाळी ६ ते सकाळी ९ वाजेच्या दरम्यान त्यांच्या शेतातील गडद काळ्या धुरामुळे त्यांना प्रदूषणाचा त्रास होतो या विषयी त्यांच्या वडिलांनी म.प्र.नि.मंडळ कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय येथे अर्ज दिलेला आहे व ते अशा दाट धुरामुळे ते काहीही पाहु शकत नाही, म्हणून या बाबतीत उपाय योजना कराव्यात अशी त्यांनी विनंती केली. **श्री. दिलीप खेडकर**, प्रादेशकि अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे सदस्य यांनी सांगितले की, सदर जाहीर लोक सुनावणी ही प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी आहे. त्यांनी **श्री. ढवळे** यांना उपरोक्त प्रदूषणाच्या समस्ये बाबत म.प्र.नि.मंडळास तक्रार कलेली आहे काय व त्याची प्रत उपलब्ध आहे काय असे विचारले. त्यावर **श्री. ढवळे** होय म्हणाले आणि त्याची प्रत त्यांनी समिती सदस्यांना सुपूर्द केली. त्यावर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की, म.प्र.नि.मंडळातर्फे सदर तक्रारीची चौकशी करण्यात येईल व त्यानुसार जवळपासच्या कारखान्यावर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल आणि जास्तीत जास्त धुराचे उत्सर्जन कमी करण्यासाठी कारखान्याला निर्देश देण्यात येतील. त्यांनी पुढे सांगितले की जर कारखाना असेल तर धुराचे उत्सर्जन होईलच, परंतु धुरामध्ये प्रदूषकाचे प्रमाण म.प्र.नि.मंडळाच्य मानकानुसार असायला पाहीजे. **श्री. ढवळे** यांनी पुन्हा सांगितले की, त्यांच्या शेतावर काळे स्तर आहेत आणि

त्यासाठी काहीतरी करायला पाहीजे, त्यावर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की, या मुददयाचा आजच्या सुनावणीशी संबंध नाही, तथापि, सदर तक्रारीची नोंद घेण्यात आलेली आहे आणि सदर तक्रारीवर निश्चितच कार्यवाही करण्यात येईल, त्यांनी पुढे सांगितले की, लोकांना धुरामुळे त्रास होतो आणि म्हणुनच आजची जाहीर लोक सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे आणि असे प्रकल्प किंवा विस्तारिकरण प्रकल्प स्थापित व्हायला पाहीजे, म्हणून पर्यावरणाविषयी कुणाला काही सुचना, आक्षेप असतील तर ते त्यांनी मोठ्या प्रामाणावर व्यक्त करायला पाहीजे असे त्यांनी सार्वजनिक सहभगींना सुचविले जेणे करुन लोकांचे म्हणने /मत तज्ज्ञ समितीकडे पोहोचविल्या जाईल आणि परवानगी देतांना जास्तीत जास्त अटी व शर्ती घालुन प्रदूषण कसे कमी करता येईल हे त्यांच्या तर्फे पाहिल्या जाईल आणि त्यांनी पुन्हा एकदा निदर्शनास आणुन दिले की लोकांचे प्रश्न, सुचना, आक्षेप हे फक्त पर्यावरणाशी संबंधीत असायला पाहीजे.

४) **श्री. एम.बी. कोरके,** ग्रामसेवक, ग्रामपंचायत दरेगाव, ता. व जि. जालना यांनी अपेक्षा केली की, प्रदूषण नियंत्रणसाठी बसविण्यात येणारी चिमणी चांगल्या प्रतीची असायला पाहिजे, रेन वाटर हार्वेस्टिंगचे काम देखील चांगले व्हायला पाहिजे जेणे करुन त्यांच्या गावाला फायदा होईल व त्यांना पाणी मिळेल, म्हणुन प्रदूषण आणि रेन वाटर हार्वेस्टिंग कडे योग्य लक्ष देण्यात यावे असे त्यांनी सुचिविले. **श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की, त्यांनी रेन वाटर हार्वेस्टिंग बसविण्याविषयी आधिच सांगितले आहे. त्यांनी सांगितले की, प्रदूषण नियंत्रण साधणे ही प्रदूषण आणि उत्पादनाच्या मानकांनुसार बसविले जातात व त्यासाठी ठराविक स्पेशिफिकेशन्स असतात, तथापि आवश्यक ती काळजी घेतल्या जाईल.

५) **श्री. सुभाष जनार्दन तिरुके,** जवळचे गाव दरेगाव, ता.व जि. जालना येथील रहीवाशी यांनी सांगितले की, जाहीर लोक सुनावणीस दरेगाव येथील फक्त ३ ते ४% लोक उपस्थित आहेत, त्यावर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की म.प्र.नि.मंडळ वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करते, ती सर्वांसाठी खुली असते, सदर जाहीर लोक सुनावणी संबंधीत संपूर्ण अहवाल, नोटीस, इ. जवळच्या ग्रामपंचायत कार्यालयात ठेवल्या जातो आणि ते लोकांकडे फिरवणे व संपूर्ण गावकऱ्यांना सांगणे आणि ज्यांना स्वारस्य आहे अशा जास्तीत जास्त लोकांना उपस्थित राहण्याविषयी सांगणे हे ग्रामपंचायतीचे कर्तव्य आहे आणि लोकांना त्यांच्या गावातुन जाहीर लोक सुनावणीच्या ठिकाणी आणण्याची व्यवस्था म.प्र.नि.मंडळ अथवा कारखाना करु शकत नाही, प्रत्येकाने स्वत:हुन यायला पाहीजे. **श्री. तिरुके** यांनी सांगितले की, ग्रामपंचायतीने सदर कार्यक्रमासाठी दवंडी द्यायला पाहीजे, त्यावर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की तो ग्रामपंचायतीचा भाग आहे व ती त्यांची अंतर्गत बाब आहे. सदर दस्ताऐवज हस्ते दिल्या जातात त्यामुळे अशा दस्ताऐवजाची पोच पावती म.प्र.नि.मंडळाकडे आहे, आणि म.प्र.नि.मंडळाने याबाबतीत संपूर्ण पध्दत अवलंबली आहे. त्यांनी सांगितले की, फक्त दरेगावातीलच नाही तर ५-१० किं.मी. च्या अन्य गावातील जास्तीत जास्त लोकांनी जाहीर लोकसुनावणीस उपस्थित रहायला पाहीजे अशा म.प्र.नि.मंडळाची इच्छा असते, कारण तो खुला मंच आहे आणि त्यांचे म्हणने, प्रश्न, सुचना, आक्षेप मांडू शकतात व ते अहवालामध्ये नोंदविल्या जातात आणि पुढिल कार्यवाहीसाठी पर्यावरण विभागाला सादर केल्या जातात. **श्री. तिरुके** यांनी सांगितले की, सदर कार्यक्रम दरेगावात आयोजित करायला पाहीजे होता असे त्यांना वाटते, त्यावर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की, सदर कार्यक्रम हा प्रकल्प स्थळावर आयोजित करायला पाहीजे असे

अधिसुचनेमध्ये उल्लेख केलेला आहे, आणि प्रकल्प स्थळावर कार्यक्रम आयोजित करायचा उद्देश असा आहे की, परिसरातील त्रिज्येच्या भागातीत जास्तीत जास्त लोकांना अशा कार्यक्रमाच्या ठिकाणी पोहचणे शक्य होते. **श्री. तिरुके** यांनी सांगितले की, त्या भागातील रेल्वे लाईनच्या मागे गट न. ६ व गट न. ३ मध्ये त्यांची आणि त्यांच्या नातेवाईकांची मिळुन साधारणत: २० ते २५ एकर शेत जमिन आहे, ज्यामध्ये २०-२५ आंब्याची झाडे आहेत, परंतु सदर झाडांना आंब्याचे फळ येण्याची स्थिती नाही आणि दुसरे जर कोणी त्यांच्या शेतात चक्कर मारला, तर त्यांच्या अंगावर काजळी/काळा स्तर आढळुन येतो. **श्री. खेडकर** यांनी सांगितले की, म्हणुनच जाहीर लोक सुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे, ज्यामध्ये लोकांनी आपल्या सुचना, अनुभव मांडायला पाहिजे. दुसरे त्यांनी असे सांगितले की, जी काय तक्रार आहे, ती तक्रार येथे करणे आवश्यक नाही, कारण ती यापुर्वी देखील करता आली असती, तथापि म.प्र.नि.मंडळातर्फे सदर तक्रारीची चौकशी केली जाईल आणि त्यानुसार कार्यवाही केलया जाइल. **श्री. खेडकर** यांनी सांगितले की श्री. तिरुके यांचा मुद्दा स्पष्ट झाला, परंतु आता म.प्र.नि.मंडळ आणि के.प्र.नि.मंडळ (MPCB & CPCB) यांनी ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टीम सुरु केलेली आहे ती चिमणीला बसविण्यात येते आणि सरळ MPCB व CPCB च्या सर्व्हर ला जोडली जाते त्यामुळे धुर उत्सर्जनाची पातळी MPCB व CPCB कार्यालयात दिसते आणि त्याचे रेकॉर्ड/नोंद कायम स्वरुपी राहते, तंत्रज्ञान सुधारल्या जात आहे आणि त्यामुळे सदर मुद्यांविषयी निश्चितच सुधारणा होईल. **श्री. तिरुके** यांनी पुढे सांगितले की, काळ्या धुरामुळे रात्रीच्या वेळी ९ ते १० वाजेच्या सुमारास उंच टेकडीवर असे राहुन देखील दरेगाव दिसत नाही व त्यांच्या शेतात पूर्णपणे काळ असते आणि जर कुणी त्यांच्या शेतावर काम करण्यासाठी जात असेल तर काळया धुरामुळे त्यांना घाण कपड्यांचा वापर करावा लागतो, त्यांच्या शेतात भाजीपाला (मेथी) देखील चांगली येत नाही. **श्री. खेडकर** यांनी सांगितले की मुद्दा लक्षात आला, म.प्र.नि.मंडळाचे अधिकारी सदर भागास भेट देऊन परिक्षण करतील, कृषि अधिकाऱ्यांना देखील सदर भागाचे परिक्षण करणसाठी विनंती केली जाईल आणि त्या अनुषंगाने कार्यवाही केली जाईल.

६) **श्री. ज्ञानेश्वर ढवळे**, जवळचे गाव दरेगाव, ता. व जि. जालना येथील रहीवाशी यांनी वैयक्तीकरित्या सदर कंपनीच्या बाबतीत त्यांची कोणतीही तक्रार नाही, तथापि त्यांनी रेशीम उद्योग सुरु केला होता, परंतु प्रदूषणाच्या समस्येमुळे तो यशस्वी झाला नाही कारण त्यांच्या आळ्या एवढ्या संवेदशील असतात की प्रदूषणामुळे त्या त्यांचे कोक (cocons) देखील तयार करु शकल्या नाही. **श्री. खेडकर** यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत कुणाच्या काही सुचना आहेत काय असे विचारले आणि सांगितले की, लोकांचे मुद्दे आणि भावना लक्षात आल्या. त्यांनी त्या भागातील सर्व सामान्य मुद्दांऐवजी खास करुन प्रस्तावित प्रकल्पासाठी प्रदूषण कमी करण्यासाठी विशिष्ट प्रकारची काळजी घेणे किंवा पर्यावरण राखण्यासाठी आपआपल्या अनुभवानुसार ठराविक उपाय करणे या बाबतीत सुचना, आक्षेप मांडाव्यात असे सुचविले. **श्री. खेडकर** यांनी पुन्हा सांगितले की त्यांचा मुद्दालक्षात आला आणि प्रस्तावित प्रकलपाबाबत काही स्पेसिफिक मुद्दा असेल तर बोला असे सांगितले. **श्री. ढवळे** यांनी जास्तीत जास्त प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी प्रयत्न करावा अशी विंनती केली.

७) **श्री. ढवळे,** जवळच्या भागातील रहिवाशी यांनी सांगितले की, त्यांनी कोणतीही तक्रार केली तर म.प्र.नि.मंडळाने त्याची दखल घ्यायला पाहीजे. त्यांनी निदर्शनास आणून दिले की, त्यांच्या

वडिलांनी सन २००८ मध्ये आमरण उपोषण केले होते. त्या अनुषंगाने तपासणी यंत्र बसविले होते, परंतु त्यांची सुध्दा योग्य ती दखल घेतल्या गेली नव्हती. म.प्र.नि.मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कारखान्यात चर्चा केली होती आणि **श्री. ढवळे** यांना कारखान्यात जाण्याची परवानगी दिली नव्हती, परंतु चर्चेमध्ये काय झाले हे आजपर्यंत त्यांना माहित नाही. **श्री. खेडकर** यांनी त्यांचा प्रश्न स्पष्ट केली की **श्री. ढवळे** यांनी तक्रार केली, आमरण उपोषण केले, परंतु परिस्थितीमध्ये काही सुधारणा झाल्याचे आढळुन आले नाही. **श्री. खेडकर** यांनी सर्वांना स्पष्ट केले की ही वायु प्रदूषण करणारी कंपनी आहे, आणि कितीही स्क्रबर किंवा अन्य यंत्रणा बसविल्या तरी धुराचे उत्सर्जन होईल, परंतु आपल्याला धुरातील प्रदूषकांचे प्रमाण नियंत्रित करावयाचे आहे, त्यासाठी यंत्रणा बसविलेली आहे, परंतु धुराचे उत्सर्जन होणार नाही अशी हमी देता येणार नाही, सर्वसाधारणपणे काळा धुर निघतो, परंतु म.प्र.नि.मंडळाच्या दृष्टीकोनातुन धुरामध्ये SPM चे प्रमाण असते, ते मोजल्या जाते, आणि जर ते मानकांच्या आत असेल तर ते प्रदूषण करीत नाही असे म्हटले जाते. श्री. ढवळे यांनी सांगितले की, त्यांच्या शेतात लहाण कण आहेत आणि पुढे ते दिल्लीतील प्रदूषणाविषयी बोलत असतांना, **श्री. खेडकर** यांनी विषयांतर न करण्याविषयी आणि प्रस्तावित प्रकल्पाविषयीच बोलावे, काही सुचना, आक्षेप असतील त्या मांडाव्यात कारण जाहीर लोक सुनावणी ही सदर प्रस्तावित प्रकल्पासाठी घेण्यात येत आहे. **श्री. ढवळे** यांनी पुन्हा त्यांच्या शेतातील प्रदूषणा बाबतचा मुद्दा उपस्थित केला, त्यावर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की, त्यांची तक्रार नोदविण्यात आलेली आहे, त्यांचे म्हणने एकुण घेतले आहे, आणि फक्त सदर प्रस्तावित प्रकल्पाविषयीच सुचना मांडाव्यात असे सांगितले. **श्री. ढवळे** यांनी प्रदूषण करीता नियंत्रण उपयांची दखल घेणे आणि त्यांच्या सुचनेची दखल घेण्याबाबत विनंती केली. **श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पामध्ये रु. १३२५ लाख किंमतीचे प्रदूषण नियंत्रण साधणे बसविण्यात येतील आणि सदर प्रकल्पामुळे कोणताही त्रास होणार नाही याची काळजी घेण्यात येईल. **श्री. सुभाष** तिरुके यांनी सांगितले की, यंत्र उपकरणे चालु रहायला पाहीजे. त्यांनी पुढे सांगितले की, त्यांच्या गावातील लोकांना चांगली नोकरी नाही किंवा ठेका नाही चांगली नोकरी बाहेरील लोकांना दिली जाते, त्यांवर **श्री. खेडकर** यांनी सांगितले की, स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येईल हे सुरुवातीलाच सांगण्यात आलेले आहे, परंतु श्री. तिरुके यांनी सांगितले की, स्थानिक लोकांना आज पर्यंत प्राधान्य देण्यात आलेले नाही, **श्री. खेडकर** यांनी सांगितले की त्याची नोंद घेण्यात येत आहे. **श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की विद्यमान प्रकल्पामध्ये ४०० कामगार कार्यरत आहेत, त्यापैकी २०० - २४० हे स्थानिक लोक आहेत आणि ते फक्त दरेगावातीलच नाहीत तर आसपासच्या गावातील सुध्दा आहेत, म्हणुन प्रस्तावित प्रकल्पामध्ये देखील स्थानिक लोकांना प्राधान्य दिल्या जाईल.

८) **श्री. ज्ञानेश्वर ढवळे**, जवळचे गाव दरेगाव, ता. व जि. जालना येथील रहिवाशी यांनी सांगितले की कंपनीचे मालक आणि दरेगावातील लोकांमध्ये गैरसमज आहेत कारण मालकांना असे वाटते की दरेगावचे लोक गुंड आहेत आणि जेव्हा ते कंपनी गेटवर काही कामासाठी जातात, तेव्हा मालक त्यांना दूर हाकलुन लावतात, त्यांनी पुन्हा सांगितले केले की, त्यांच्या गावातील एकही व्यक्ती उच्च पदावर नाही, त्यांनी सांगितले की त्यांना कंपनीच्या विरोधात काही बोलायचे नाही, परंतु त्यांच्या गावातील व्यक्ती उच्च पदावर असावा अशी त्यांची इच्छा आहे. त्यांनी मे. ओम साईराम स्टील अॅड अॅलॉईज प्रा.लि. कंपनीच्या अधिकाऱ्यांना विनंती केली की, त्यांनी त्या

बाबतीत नोंद घ्यावी आणि कंपनीमध्ये दरेगावच्या जर एखादा गुन्हेगार आढळुन आला तर त्यांना कंपनीतुन लगेच काढुन टाकावा असे सुचविले. **श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की, स्थानिक लोकांना त्यांच्या पात्रतेनुसार प्राधान्य देण्यात येईल. **श्री. ढवळे** यांनी सदर कंपनीत मजुर ठेवण्याविषयी विचारले ते कंपनीला सहकार्य करतील असे देखील त्यांनी सांगितले, त्यावर **श्री. रहांगदळे** यांनी सांगितले की त्यांना सुध्दा लोकांकडून सहकार्य अपेक्षित आहे आणि कंपनी आणि दरेगावच्या लोकांमध्ये जे काही गैर समज आहेत ते दरेगावचे प्रतिनिधी /सरपंच अन्य स्टील उद्योगांच्या एच.आर (HR) विभागातील प्रतिनिध यांच्या समवेत बैठक घेऊन सोडविण्यात येतील/दूर केल्या जाईल. **श्री. ढवळे** यांनी निदर्शनास आणुन दिले की, दरेगावपासुन मऔविम वसाहतीकडे जाण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे मऔविम वसाहती कडे जाण्यास सामान्य माणसाला कठिण होते. **श्री. खेडकर** यांनी सांगितले की भावना आणि मुद्दे या दोन्ही बाबी लक्षात आल्या आणि स्थानिक लोकांना रोजगार मिळावा हे शासनाचे धोरण आहे, परंतु आजची जाहीर लोक सुनावणी ही फक्त पर्यावरणासाठी आहे, म्हणुन फक्त पर्यावणाशी संबंधीत समस्या, प्रश्न, सुचना मांडाव्यात अशी अपेक्षा आहे. त्यांनी पुढे सांगितले की जाहीर लोक सुनावणी समिती ही अन्य मुद्यांबाबत काहीही सुचवत नाही. परंतु दरेगाावातील लोक शासनाचे विभाग वैगेरे यांनी एकत्रित चर्चा करुन मुद्दा कसा सोडवला जाईल हे पहायला पाहिजे.

**डॉ. योगिनी बाळंखे** यांनी पुन्हा कुणाला काही प्रश्न विचारायेच आहेत काय असे विचारले परंतु, कोणाचे काही प्रश्न विचारायचे शिल्लक राहीले नाही असे निदर्शनास आल्या नंतर **श्री. रविंद्र परळीकर** प्रभारी अतिरीक्त जिल्हादंडाधिकारी, जालना तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी सांगितले की मे. ओम साईराम स्टील ॲड ॲलॉईज प्रा.लि. या कंपनिच्या उत्पादन आणि विस्तारिकरणाविषयी काही त्रुटी, मते असतील तर ते मांडण्यासाठी जाहीर लोक सुनावणी आयोजित करण्यात आली होती आणि ज्या काही समस्या उपस्थित केल्या त्यांची म.प्र.नि.मंडळातर्फे नोंद करण्यात आलेली आहे व त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यांनी सागितले की, विस्तारीकरण करतांना जर काही समस्या असतील आणि त्यानुसार लोकांनी त्यांच्या समस्या व्यक्त कराव्या अशी अपेक्षा होती परंतु लोकांनी काही समस्या मांडल्या जसे तुतीची लागवड (रेशीम उद्योग), प्रदूषणामुळे शेतजमीन, पिकांचे नुकसान, जास्तीचेवायु उत्सर्जन जे आरोग्यावर परिणाम करु शकते म्हणून त्यांनी जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष या नात्याने म.प्र.नि.मंडळाच्या अधिकाऱ्यानी जर काही तक्रार असेल तर त्याची दखल घेणे आणि सुनावणी घेऊन लोकांना योग्य ते मार्गदर्शन करण्या विषयी सुचविले. त्याचप्रमाणे स्थानिक लोकांना रोजगार कसा मिळेल या बाबत काळजी घेण्यात यावी असे त्यांनी मे. ओम साईराम स्टील ॲड ॲलॉईज प्रा.लि. या कंपनीला सुचविले. प्रदूषण नियंत्रणासाठी जो काही निधी राखुन ठेवला त्यांचा योग्य नियंत्रणाखाली योग्य पध्दतीने उपयोग करावा असे सुध्दा त्यांनी सुचविले. त्यांनी सांगितले की, आपण २१ व्या शतकाकडे जात आहोत आणि कारखाना बंद ठेवून पर्यावरणाचा समतोल राखता येणार नाही, म्हणून कारखाना चालु राहिला पाहिजे, विकासात्मक दृष्टी ठेवायला पाहीजे आणि प्रकल्प संचालक, जाहीर लोक सुनावणीस उपस्थित असलेले लोक आणि म.प्र.नि.मंडळाचे अधिकारी यांनी योग्य ती दखल घेवुन सदर प्रकल्पाच्या पुढील वाटचालीसाठी प्रयत्न करायला पाहिजे अशी अपेक्षा केली.

**श्री. दिलीप खेडकर**, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, औरंगाबाद तथा जाहीर लोक सुनावणी समितीचे सदस्य यांनी सांगितले की, सार्वजनिक सहभागींची मते समाविष्ट असलेले जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त अहवालासहीत शासनाला सादर करण्यात येईल. त्यांनी सांगितले की प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास परवानगी द्यायची किंवा नाही, आणि जर ती द्यावयाची असेल तर आधुनिक यंत्रणा बसविण्यात अटी घालुन परवानगी दिल्या जाऊ शकते आणि नविन तंत्रज्ञान हे निश्चित प्रदूषण नियंत्रित करण्यास मदत करीन अशी त्यांना खात्री आहे. नंतर त्यांनी जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सार्वजनिक सहभागींचे आभार मानुन जाहीर लोक सुनावणी संपन्न केली.

शेवटी अध्यक्षांचे आभार मानुन जाहीर लोकसुनावणी संपन्न झाली.

(दिलीप खेडकर)
सदस्य

(रविंद्र परळीकर)
अध्यक्ष

(डॉ. योगिनी बाळंखे)
समन्वयक